महाराष्ट्र शासन

# औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

## सक्षम व्यक्ती प्रमाणपत्र

प्रमाणपत्र क्रमांक : MS/DISH/CPC/R-014/2019

मी, श्री. सु.प्र. राठोड, प्रभारी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई, कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम 2(ca) आणि त्या अंतर्गत असलेल्या नियमांच्या नुसार दिलेल्या शक्तीचा वापर करुन **श्री. मितल रामभाऊ राऊत,** २११, बळवंत अर्जुन राऊत मार्ग, मुळगांव (कुंभारवाडी), खोचिवडे आईस फॅक्टरीजवळ, वसई (पश्चिम), जि. पालघर-४०१ २०१, यांना महाराष्ट्र राज्यातील कारखान्यांत वापरल्या जाणा-या खालील नमूद केलेल्या उपकरणांच्या चाचण्या, परीक्षण, तपासणी व प्रमाणित करण्याकरीता खालील कलम व त्या अंतर्गत असलेल्या नियमांनुसार महाराष्ट्र राज्यासाठी सक्षम व्यक्ती म्हणून मान्यता देत आहे.

i) Section 28 : Lifts and Hoists.
ii) Section 29 : Lifting Machines, Chains, Ropes, Lifting Tackles.

**या प्रमाणपत्राची वैधता ३१/१२/२०१९ पर्यंत आहे**

सदर प्रमाणपत्र खालील नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यात येते :-

१. चाचणी, तपासणी व परीक्षण हे अधिनियम व त्या अंतर्गत असलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार केले पाहिजे.
२. अधिनियम व त्या अंतर्गत असलेल्या नियमांमध्ये नमूद केले नसल्यास, प्रत्येक चाचणी/तपासणी ही संबंधित मानकांनुसार केली पाहिजे.
३. चाचणी/तपासणी केल्यानंतर जर उपकरणांमध्ये दोष आढळले असतील, काही दुरुस्त्या अथवा फेरफार सुचविण्यात आले असतील, तर अशा सर्व प्रकरणांमध्ये चाचणी/तपासणीच्या प्रती संबंधित उप/सहाय्यक संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांना ७ दिवसात सादर कराव्यात.
४. चाचणी आणि तपासणी दरम्यान सक्षम व्यक्तीने प्रत्यक्ष उपस्थित रहावे आणि केलेल्या कामाचा तपशील, केलेली निरीक्षणे, दिलेले निर्देश इत्यादीची नोंद विहीत नमुन्यातील लॉग बुकमध्ये ठेवावी.
५. वापरण्यात येणारी उपकरणे व सुविधा या सदैव चांगल्या व कार्यक्षम अवस्थेत ठेवावीत आणि वेळोवेळी कॅलिब्रेट करून घ्यावीत.
६. सशर्त प्रमाणपत्रे जारी करु नयेत.
७. जारी केलेल्या प्रत्येक चाचणी/तपासणी प्रमाणपत्रावर, प्रमाणपत्र क्रमांक आणि वैधता कार्यकाल नमूद करावा.
८. वैधता कार्यकाल संपल्यानंतर चाचण्या/तपासण्या करु नयेत.
९. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर सक्षम व्यक्ती प्रमाणपत्र रद्द करण्याचे, विलोपन करण्याचे अथवा दुरुस्त करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.
१०. सक्षम व्यक्ती प्रमाणपत्र नूतनीकरण करण्याकरीता अर्ज, वैधता कालावधी संपण्याआधी कमीत कमी दोन महिने केला पाहिजे.
११. महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्तावित केलेल्या सक्षम व्यक्तीबाबतचे नवीन नियम आणि अटी, संबंधित आदेशाच्या दिनांकापासून लागू होतील.

क्र. औसुवआ/सूट/सव्यप्र/४९४/१ ७२ /१,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,
कामगार भवन, ५ वा मजला, वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

दिनांक : - 3 JAN 2019

(सु. प्र. राठोड)
प्रभारी संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

Scanned by CamScanner